# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५३००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ४०१-२२** **दिनांक ३०/१२/२०२२**

## महिला व तिच्या ४ लहान मुलांची २८ वर्षांपुर्वी अमानुष हत्या करुन फरार झालेल्या आरोपीतास अटक.
## गुन्हे शाखा, कक्ष १, काशिमिरा यांची कामगिरी.

दिनांक १६/११/१९९४ रोजी १५.४५ वा.ते २३.०० वा.चे दरम्यान आरोपीत १) अनिल सरोज, २) सुनिल सरोज व ३) काल्या ऊर्फ राजकुमार यांनी पुर्ववैमनस्यातुन पुर्व तयारी करुन चॉपर व सुरी घेवून फिर्यादी राजनारायण शिवचरण प्रजापती रा. भारवाड चाळ, पेणकर पाडा, काशिमीरा यांचे घरात घुसुन त्यांची १) पत्नी जगरानीदेवी प्रजापती, वय २७ वर्षे, २) मुलगा कु. प्रमोद, वय ५ वर्षे, ३) मुलगी कु. पिंकी वय ३ वर्षे, ४) कु. पिंटू, वय २ वर्षे, ५) ३ महिन्याचा लहान मुलगा यांना गंभीर दुखापत करुन त्यांची निघृणपणे हत्या करुन पुरावा नष्ट करणेसाठी फिर्यादी यांची घराचे दरवाजास बाहेरुन बंद करुन वापरलेली हत्यारे व अंगावरील रक्ताने माखलेले कपडे आरोपीत राहत असलेल्या घरात लपवून ठेवले होते. सदर घटनेबाबत काशिमिरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०७/१९९४ भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१, ४५२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील आरोपी हे गुन्हा घडल्यापासून फरार झाले होते. नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपीतांचा अदयाप पावेतो ठावठिकाणा न लागल्याने सदर गुन्हा बराच कालावधी पर्यंत उघडकीस आला नव्हता. सदर गुन्हा गंभीर असून बराच कालावधी पर्यंत उघडकीस न आल्याने वरिष्ठांनी तो उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा, कक्ष १, काशिमिरा येथे नेमणुकीस असलेले पोहवा. ०००२४/पुष्पेंद्र थापा यांना मिळालेल्या गोपनीय माहीतीवरुन गुन्हे शाखा, कक्ष १, कशिमिराचे अधिकारी व अंमलदार यांनी जुन २०२१ मध्ये वाराणसी, उत्तरप्रदेश येथे २० दिवस वास्तव्य करुन स्पेशल टास्क फोर्स (STF) वाराणसीचे मदतीने तपास केला. त्यामध्ये आरोपीत नामे काल्या ऊर्फ राजकुमार अमरनाथ चौहान हा कामानिमित्त परदेशी असतो अशी प्राथमिक माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीप्रमाणे मु. कैराडी, पो. पचवनीया, ता. चकीया, जि. बनारस, उत्तर प्रदेश येथे स्थानिक बातमीदार तयार करुन अधिक तपास केला असता आरोपीत राजकुमार ऊर्फ काल्या हा कामानिमीत्त परदेशी असतो व दोन तिन महिन्याकरीता मुळ गावी परत येत असतो अशी माहिती मिळाली. त्याप्रमाणे तपास करता आरोपीत हा सन २०२० मध्ये Vostro account of Doha & (W.L.L.) Qatar या कंपनीत Qatar देशामध्ये कामानिमीत्त गेला आहे व नजिकचे काळात मुळ गावी येणार आहे अशी खात्री लायक माहीती मिळाली. त्याप्रमाणे आरोपीत काल्या ऊर्फ राजकुमार याचा पासपोर्ट नंबर मिळवुन त्याला गुन्हे शाखा, कक्ष १, काशिमीरा मार्फत LOC वर ठेवून त्याच्या हालचालीवंर पाळत ठेवण्यात आली होती.

दिनांक २९/१२/२०२२ रोजी आरोपीत नामे सावलाला ऊर्फ काल्या उर्फ साहेब उर्फ राजकुमार अमरनाथ चौहान, वय १९ वर्षे, (गुन्हा करतेवेळी वय), रा. मु. कैराडी, पो. पचवनीया, ता. चकीया, जि. बनारस, उत्तर प्रदेश हा Qatar येथुन विमानाने मुंबई इंटरनॅशनल एअर पोर्ट येथे आला. तो LOC वर

असल्याने एअरपोर्ट ॲथॉरिटीने त्यास थांबवुन सदरची माहिती काशिमीरा पोलीस ठाणे येथे देवुन त्यास काशिमीरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.निरी कैलास टोकले, स.पो.नि. पुष्पराज सुर्वे, पो.उप.निरी. हितेंद्र विचारे, सफौ. राजु तांबे, सफौ. संदीप शिंदे, सफौ. किशोर वाडीले, सफौ. संजय पाटील, पोहवा. संजय शिंदे, पोहवा. संतोष लांडगे, पोहवा. पुष्पेंद्र थापा, पोहवा. विजय गायकवाड, पोहवा. प्रफुल्ल पाटील, पोहवा. विकास राजपूत, पोहवा. सचिन सावंत, पोहवा. समीर यादव, पोशि. प्रशांत विसपुते, पो.शि. सनी सुर्यवंशी तसेच उत्तर प्रदेश एस.टी.एफ. वाराणशी ब्रँचचे श्री शैलेश प्रताप सिंह, पो.उप अधिक्षक, श्री अमित श्रीवास्तव पो.निरी., पो.उप-निरी. श्री अंगदसिंह यादव, पो.हवा. अदविंद सिंह, पो.कॉ. सत्यपाल सिंह तसेच पोलीस मित्र राहुल राठोड यांनी केली आहे.

---ooo---